आवक/जावक नं. ९८
दिनांक ५/७/९९

०७४३

क्र. : माध्य. ३ /९९/ ५ वी ते ७ वी / पुवि / २
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे -१, यांचे कार्यालय
दिनांक : 29 JUN 1999

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद पुणे

विषय - इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळेत सुरू करण्यास परवानगी देणेबाबत.

शाळा : - ग्राम प्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे, ता. मावळ

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/ह-४/५ वी/९८-९९, दि. २८.४.९९

उपरोक्त विषयाधीन संदर्भाच्या पत्रान्वये कळविण्यात येते की, सन १९८३-८४ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी दिलेल्या नवीन माध्यमिक शाळांना इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग नव्याने सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत शासनाचे पत्र क्र. एसएसएन/~~१०८५ / २३४८५ / (२४४ एम) माशि-१, दिनांक २९-१-८६ व २०-१२-८८~~ १०९७ [५२८] ९२/माशि-१, दि. १.३.९९ च्या शासन आदेशानुसार विभागीय शिक्षण उपसंचालकांना अधिकार प्रदान केलेले आहेत.

२/- सदर अधिकारांच्या अधिन राहून, खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर ग्रामप्रबोधिनी निगडी या संस्थेच्या ग्रामप्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे, ता. मावळ या माध्यमिक विद्यालयांत इ. ५ वी ~~ते ७ वी~~ चे वर्ग सुरू करण्यास सन १९ ९९ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्त्वावर परवानगी देण्यात येत आहे.

अटी - १) इ. ५ वी ते ७ वी चे वर्गाची परवानगी ही विनाअनुदान तत्त्वावर राहील.
२) मा. शा. संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता शाळेने करणे आवश्यक आहे.
३) वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश / नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.

वरीलप्रमाणे संबंधितांस कळवावे. शाळेने सुरू केलेल्या सदर वर्गाची तपासणी वार्षिक तपासणीचे वेळी करावी व त्याबाबतचे योग्य ते अभिप्राय तपासणी अहवालामध्ये नमूद करावेत.

स्वाक्षरित ... र. गांधी
सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे -१

प्रत -*१) मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तारभवन मुंबई ३२, यांना सविनय सादर

२) मुख्याध्यापक, ग्राम प्रबोधिनी विद्यालय
साळुंब्रे, ता. मावळ.